# प्रेसनोट

दि.११/०४/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | मिरजगांव पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | ओंकार ईश्वर आवटे, वय—२५ वर्ष, ग्रामसेवक, वर्ग—३, चांदे खुर्द, ता.कर्जत, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ७०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०००/— रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार हे शेतकरी असुन, त्यांनी शासनाच्या गाय गोठा योजने अंतर्गत अनुदानासाठी पंचायत समिती कर्जत येथे प्रकरण सादर केले होते, ते प्रकरण मंजूर करुन देण्यासाठी ग्रामसेवक चांदे खुर्द यांनी तक्रारदार यांचेकडे ७०००/— रुपये लाच मागणी केल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कडे आज रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.११/०४/२०२३ रोजी चांदे खुर्द गावी लाच मागणी पडताळणी करण्यात आली, लाच मागणी पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेवक ओंकार ईश्वर आवटे, वय—२५ वर्ष, ग्रामसेवक, वर्ग—३, चांदे खुर्द, ता.कर्जत, जि.अहमदनगर यांनी गट विकास अधिकारी कर्जत अमोल जाधव यांचेकडून सदर प्रकरण मंजूर करुन घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे अमोल जाधव यांचे करिता ७०००/— रुपये लाचेची मागणी करुन प्रथम ५०००/— रुपये व काम झाल्यानंतर २०००/— रुपये स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले, त्यानुसार आज दि.११/०४/२०२३ रोजी चांदे खुर्द येथे लाचेचा सापळा आयोजित केला असता आरोपी लोकसेवक ओंकार ईश्वर आवटे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून ५०००/— रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत मिरजगांव पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो अहमदनगर

(हरीश खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर